हॅलो प्रभात

# 'ब्लुम टेक्सोनॉमी'द्वारे प्रभावी प्रश्नपत्रिका निर्मितीचे मार्गदर्शन : डॉ. उत्तम जाधव



कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद कॉलेजच्या परीक्षा विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तर्फे 'प्रश्नपत्रिका तयार करण्याची मुख्य संकल्पना आणि मार्गदर्शन' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. मुख्य अतिथी डॉ.उत्तम जाधव यांनी ब्लुम टेक्सोनॉमी पध्दतीद्वारे प्रश्नपत्रिका तयार करण्याची प्रभावी पद्धत, प्रश्नांचा स्तर निश्चिती व मुल्यमापनातील उपयोग याबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी परीक्षेची स्वायतत्ता जपत प्रश्नपत्रिकेत नव्या संकल्पनांचा वापर गरजेचा असल्याचे सांगितले. शिबीराचे आयोजन समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जी.जे.नवाथे यांनी, सूत्रसंचालन प्रा. माधुरी पवार यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. शिबिरास प्राध्यापक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

epaper.helloprabhat.in
15 Oct 2025 - Page 3